केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत
यवतमाळ शहराच्या पाणी पुरवठा (टप्पा-२)
प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक अमृत-२०१६/प्र.क्र.४६०(३)/नवि-३३**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
**दिनांक :- १३ डिसेंबर, २०१६**

वाचा :- १. शासन निर्णय नगर विकास विभाग क्र: अमृत-२०१५/प्र. क्र.१९७/नवि-३३, दिनांक १३ ऑक्टोबर, २०१५.
२. अमृत अभियानांतर्गत गठीत राज्यस्तरीय उच्चाधिकार समितीच्या दिनांक ०२/१२/२०१६ रोजी पार पडलेल्या बैठकीचे इतिवृत्त
३. शासन परिपत्रक, नगर विकास विभाग क्र: अमृत-२०१६/प्र.क्र.१६३/नवि-३३, दिनांक १६ मे, २०१६ व १२ जुलै, २०१६.

**प्रस्तावना :-**

केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानाची अंमलबजावणी संदर्भाधीन शासन निर्णयान्वये राज्यामध्ये सन २०१५-१६ वर्षापासून राज्यामध्ये करण्यात येत आहे. सदर अभियानांतर्गत पाणीपुरवठा, मलनिस्सारण, पर्जन्यजलवाहिनी, नागरी परिवहन व हरित क्षेत्र विकास इ. पायाभूत सुविधांची निर्मिती अभियान शहरांमध्ये करण्यात येणार आहे. त्यानुसार सदर अभियानांतर्गत सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये राज्याच्या रु. २४८९.९१ कोटी किंमतीच्या आराखडयास केंद्र शासनाने मान्यता दिलेली असून सदर आराखडयामध्ये यवतमाळ शहराच्या पाणी पुरवठा (टप्पा-२) प्रकल्पाचा समावेश आहे.

०२. अमृत अभियानांतर्गत सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाच्या आराखडयामध्ये समाविष्ट असलेल्या पाणी पुरवठा (टप्पा-२) प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल हा यवतमाळ नगरपरिषदेमार्फत तयार करण्यात आला आहे. केंद्र शासनाच्या सूचनेनुसार सदर प्रकल्प अहवालास अमृत अभियानांतर्गत गठीत करण्यात आलेल्या राज्यस्तरीय तांत्रिक समितीने व तदनंतर राज्यस्तरीय उच्चाधिकार समितीने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार राज्यस्तरीय उच्चाधिकार समितीने केलेली शिफारस व शासनाच्या मान्यतेच्या अनुषंगाने अमृत अभियानाच्या सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाच्या राज्य वार्षिक कृति आराखडयामध्ये समाविष्ट असलेल्या यवतमाळ शहराच्या पाणी पुरवठा (टप्पा-२) प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये केंद्र शासनाकडून मंजूर केलेल्या राज्य वार्षिक कृति आराखडयामध्ये समाविष्ट असलेल्या यवतमाळ शहराच्या पाणी पुरवठा (टप्पा-२) प्रकल्पास संदर्भाधीन शासन निर्णयातील अटी व तरतुदीच्या अधीन राहून खालील परिच्छेद क्र. २ मधील विवरणपत्रात नमूद केल्यानुसार या शासन निर्णयाद्वारे

प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे. तसेच अमृत योजनेंतर्गत यवतमाळ शहर पाणी पुरवठा प्रकल्प टप्पा-१ सहीत सदर योजनेच्या एकत्रित निविदा काढून प्रकल्प राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

०२. यवतमाळ शहर पाणी पुरवठा (टप्पा-२) प्रकल्पातील उपांगे व त्यांचे किंमतीचे विवरण पुढीलप्रमाणे आहे:-

| Sr. No. | Name of Sub Work | Amount (In Cr.) |
|---|---|---|
| 1 | Working Survey | 0.50 |
| 2 | Construction of Approach Channel, L- 60 mt. | 0.63 |
| 3 | Construction Of RCC Jack Well ( 7 X 22 X 18M ) & Pump House (12 X 29 M) | 2.60 |
| 4 | Construction of RCC Approach Bridge Length-150 Rmt With Earthen Bund L-120 Rmt for Jack Well | 1.29 |
| 5 | Construction of RCC Platform for Sub-Station at Bembla Head Works | 0.86 |
| 6 | Construction of Approach Road For Head Works & WTP, L- 3500 Rmt | 1.75 |
| 7 | Raw Water Rising Main From Jack Well to WTP Of Dia. 1000 mm D. I. K-9, Length 19750 Rmt | 46.62 |
| 8 | Construction of Conventional Water Treatment Plant Of Capacity 48 Mld with Extra Drainage, Retaining Wall & Slab Culvert | 9.95 |
| 9 | Pure Water Rising Main From WTP to Office P.W. Sump Of Dia. 800 mm D. I. K-9, Length 9200 Rmt | 15.81 |
| 10 | Construction of P.W. RCC SUMP of Capacity 5.0 Lakh Liter at Office premises | 0.23 |
| 11 | Gravity Mains from MBR to ESRs. For Vittalwadi & Bele Layout ESR Of Dia. 250 & 300 mm D. I. K-7, L- 4606 Rmt | 1.60 |
| 12 | Construction of RCC ESR For Vittalwadi & Bele Layout ( 2 Nos ) | 1.81 |
| 13 | Providing, Lowering, Laying, & Jointing Distribution System Of Dia. 250 to 450 mm D.I. K-7 & HDPE 110 to 200 mm, Length - 499 Kms | 68.86 |
| 14 | Raw Water Pumping Machinery Of 525 Bhp, Q- 560000 Lph, Head- 172 m, ( Total 4+2 = 6 Nos) | 7.09 |
| 15 | Pure Water Pumping Machinery Of 200 Bhp, Q- 511875 Lph, Head- 70 m, ( Total 4+2 = 6 Nos) | 3.56 |
| 16 | Provision for Express Feedar & Sub Station For Head Works (33 KV) and WTP (11 KV) | 20.15 |
| 17 | Flow Meter ( Ultrasonic / Electromagnetic / Bulk type Ultrasonic) | 0.48 |
| 18 | Provision for SCADA | 12.19 |

| Sr. No. | Name of Sub Work | Amount (In Cr.) |
|---|---|---|
| 19 | Provision for Solar Power System at Head Works | 21.64 |
| 20 | GIS Mapping of Town for Various Utility Including Water Management | 0.49 |
| 21 | Construction of Staff Quarters & Dormitory | 0.69 |
| 22 | Miscellaneous Work | |
| | 1) Provision For Canal & Forest Land Crossing Payment | 0.90 |
| | 2) Provision for Payment to Irrigation Dept. For Lifting Raw Water From Dam | 0.60 |
| 23 | Add expenditure already incurred against construction of intake well and connecting main with coffer dam in submergence of dam. | 1.09 |
| | **Total Cost** | **221.39** |
| | **यवतमाळ शहर पाणी पुरवठा प्रकल्प२ व १ टप्पा) ) पूर्ण करण्याचा कालावधी** | **कार्यादेश दिनांकापासून ३० महिने** |

**०३.** यवतमाळ शहर पाणी पुरवठा (टप्पा-२) योजनेचा केंद्र शासनाकडून मंजूर राज्य वार्षिक कृति आराखडयानुसार वित्तीय आकृतिबंध पुढीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव | योजनेची मंजूर किंमत (डीपीआर नुसार) | केंद्र शासनामार्फत अनुज्ञेय अनुदान (प्रकल्प किंमतीच्या ५०%) | राज्य शासनामार्फत अनुज्ञेय अनुदान (प्रकल्प किंमतीच्या २५%) | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा सहभाग (प्रकल्प किंमतीच्या २५%) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | यवतमाळ नगरपरिषद | रु. २२१.३९ कोटी | रु. ११०.७० कोटी | रु. ५५.३४ कोटी | रु. ५५.३५ कोटी |

**०४.** संदर्भाधीन क्रमांक १ येथील शासन निर्णयानुसार यवतमाळ शहर पाणी पुरवठा (टप्पा-२) प्रकल्पास खालील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे :-

४.१ सदर प्रकल्पासाठी कार्यान्वयन यंत्रणा **महाराष्ट्र जीवन प्राधिकरण** राहील.

४.२ केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचना व राज्य शासनाच्या संदर्भाधीन शासन निर्णयानुसार सदर प्रकल्पाची अंमलबजावणी करणे कार्यान्वयन यंत्रणेस बंधनकारक राहील.

४.३ राज्य शासनाने शासन परिपत्रक क्रमांक अमृत-२०१६/प्र.क्र.१६३/नवि-३३, दिनांक १३ मे, २०१६ व १२ जुलै, २०१६ नुसार विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार यवतमाळ शहराच्या पाणी पुरवठा टप्पा १ व २ ची निविदा प्रक्रिया व अंमलबजावणी विहित कालावधीमध्ये पूर्ण

करणे संबंधित कार्यान्वयन यंत्रणेवर बंधनकारक राहील. या प्रकल्पासाठी पाईपसह सर्व बाबींचा निविदेत समावेश करण्यात यावा.

४.४ यवतमाळ शहराच्या पाणी पुरवठा टप्पा १ व २ या प्रकल्पाच्या एकत्रित निविदा या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने अमृत अभियानातील पाणी पुरवठा प्रकल्पांसाठी निर्गमित केलेल्या नमुना निविदा प्रपत्रानुसार करणे कार्यान्वयन यंत्रणेस बंधनकारक राहील.

४.५ सदर टप्पा १ व २ च्या एकत्रित प्रकल्पाच्या कामाचे कार्यादेश प्रशासकीय मंजूरीच्या आदेशापासून ४० दिवसांच्या आत देण्यात येतील याची कार्यान्वयन यंत्रणेने दक्षता घ्यावी.

४.६ राज्यस्तरीय उच्चाधिकार समितीच्या बैठकीतील इतिवृत्तामध्ये नमूद करण्यात आलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित अभियान शहरांस व कार्यान्वयन यंत्रणेस बंधनकारक राहील.

४.७ केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत केंद्र शासनाने विहित केलेल्या सुधारणांची (Reforms) पूर्तता विहित कालावधीत पूर्ण करणे संबंधित अभियान शहरास बंधनकारक राहील.

४.८ **<u>निधी वितरणाची कार्यपद्धती</u>:-** केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार केंद्र शासन हिश्याचा निधी हा तीन टप्यात (२०टक्के + ४०टक्के + ४०टक्के) वितरीत केला जाणार आहे. त्यानुसार केंद्र शासनाकडून वितरीत निधीच्या प्रमाणात राज्य हिश्याचा निधी केंद्र हिस्सा वितरीत करताना सोबत वितरीत केला जाईल.

४.९ सदर प्रकल्पासाठी केंद्र व राज्य शासनाच्या हिश्याचा प्रथम हप्त्याचा निधी कार्यादेश दिल्यानंतर नगरपरिषदेस वितरीत करण्यात येईल. सदर निधी नगरपरिषंदेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास तात्काळ वितरीत करणे आवश्यक राहील. त्यानुसार केंद्र शासनाने विहित केल्यानुसार त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र केंद्र शासनास सादर केलेनंतर पुढील हप्त्याचा केंद्र हिश्याचा व त्याप्रमाणात राज्य हिश्याचा निधी वितरीत करण्यात येईल.

४.१० अभियानाच्या वित्तिय आकृतीबंधानुसार केंद्र व राज्य शासनाने वितरीत केलेल्या निधीच्या प्रमाणात नागरी स्थानिक स्वराज संस्था हिश्याचा निधी उभा करून सदर खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र केंद्र शासनाने विहित केलेल्या प्रपत्रात शासनास सादर करणे संबंधित नागरी स्थानिक स्वराज संस्थेवर बंधनकारक असणार आहे.

४.११ सदर प्रकल्पासाठी निधी वितरीत करताना दिलेल्या सूचनांनुसार, सदर प्रकल्पासाठी प्राप्त निधी शासनाच्या प्रचलित धोरणानुसार विहीत केलेल्या बँकांमध्ये, स्वतंत्र खाते उघडून ठेवणे अनिवार्य राहील. सदर प्रकल्पासाठी वितरीत केलेला निधी त्याच प्रकल्पासाठी वापरणे बंधनकारक असून त्याचा वापर इतर प्रयोजनार्थ केल्यास सदर बाब ही गंभीर वित्तिय अनियमितता समजण्यात येईल.

४.१२ राज्य शासनामार्फत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी प्रकल्प मंजूर झाल्यानंतर, मूळ प्रकल्प किंमतीमध्ये कोणत्याही कारणास्तव वाढ झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कार्यान्वयन यंत्रणेची राहील. राज्य शासनामार्फत त्या करिता कोणतेही वाढीव अनुदान उपलब्ध केले जाणार नाही.

४.१३ सदर प्रकल्पाची अंमलबजावणी विहित कालावधीत पूर्ण करण्याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित कार्यान्वयन यंत्रणेची राहील.

४.१४ प्रकल्पाचे काम सुरु झालेनंतर प्रकल्प व्यवस्थापक सल्लागाराने कामाची गुणवत्ता व देयके प्रमाणित केलेनंतर उपलब्ध निधीच्या मर्यादेत कामाची देयके १५ दिवसांत संबंधित कंत्राटदारास देण्याची जबाबदारी संबंधित कार्यान्वयन यंत्रणेची राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१६१२१३१०५३४१४०२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

Pandurang Jotiba Jadhav

Digitally signed by Pandurang Jotiba Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=300d785e12fdc19db0612f1ffdf83e54efe7da2b1bc63d18df8e09b3c7eece65, cn=Pandurang Jotiba Jadhav
Date: 2016.12.13 17:56:36 +05'30'

**(पां.जो.जाधव)**
**सहसचिव ,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा .मुख्यमंत्री यांचे सचिव.
२. मा.मंत्री (पाणीपुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव.
३. मा.राज्यमंत्री (नगरविकास) यांचे खाजगी सचिव
४. अप्पर मुख्य सचिव, वित्त विभाग यांचे स्वीय सहायक
५. अप्पर मुख्य सचिव,नियोजन विभाग यांचे स्वीय सहायक
६. प्रधान सचिव,पाणी पुरवठा (टप्पा-२) विभाग यांचे स्वीय सहायक
७. सचिव,नगरविकास विभाग (२) यांचे स्वीय सहायक
८. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई.
९. आयुक्त तथा संचालक ,नगरपरिषद प्रशासन संचालनालय ,मुंबई.
१०. विभागीय आयुक्त, अमरावती.
११. जिल्हाधिकारी, यवतमाळ
१२. जिल्हा प्रशासन अधिकारी, यवतमाळ
१३. मुख्याधिकारी, यवतमाळ नगरपरिषद, जि. यवतमाळ.
१४. निवडनस्ती, नवि-३३.